**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शुक्रवार दिनांक १९ जून २०२६**

**ठळक बातम्या**

1. **नागपुरात अंबाझरी इथं दहा हजार टनाच्या ॲल्युमिनियम एक्सट्रुजन प्रेस यंत्राची संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते पायाभरणी.**
2. **प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं पंतप्रधानांच्या हस्ते वितरण.**
3. **शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी सुरु असलेलं रविकांत तुपकर यांचं अन्नत्याग आंदोलन मंत्री गिरीश महाजन यांच्या मध्यस्थीनंतर स्थगित.**
   **आणि**
4. **वर्धा जिल्ह्यात उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी.**

**आता सविस्तर बातम्या .......**

**केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह**

2014 पूर्वी देशाअंतर्गत संरक्षण उत्पादन 46 हजार कोटी होते. ते मागील आर्थिक वर्षांमध्ये 1 लाख 78 हजार कोटीहून अधिक झालं आहे. रक्षा निर्यात देशांतर्गत उत्पादनामुळे सुमारे 40 हजार कोटीवर गेली असल्याची माहिती केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह  यांनी दिली. सिंह यांनी आज नागपूरातील अंबाझरीमधील यंत्र इंडिया लिमिटेड या आयुध कारखान्यातील अत्याधुनिक 10 हजार टन ॲल्युमिनियम एक्सट्रूजन प्रेसचं भूमिपूजन केलं, त्यावेळी आयोजित समारंभात ते बोलत होते. देशांतर्गत वाढत्या उत्पादनामुळे आपल्या सामर्थ्यात वाढ होत असून ठरवलेलं निर्यात लक्ष्य आपण वेळेआधी पूर्ण करू असा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला

संरक्षण क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या  मोठ्या शस्त्रास्त्रांमध्ये असणाऱ्या छोट्या भागांची चर्चा कमी होते. परंतु याच छोट्या पण महत्वाच्या भागांमुळे या शस्त्रास्त्रांची कार्यक्षमता वाढते. आज भूमिपूजन झालेल्या ॲल्युमिनियम एक्स्ट्रीज्युन प्रेस संयंत्रातून निर्माण झालेले भाग केवळ शस्त्रास्त्रांमध्येच नव्हे तर रेल्वे, इस्रो, डीआरडीओ यासारख्या संस्थांच्या यंत्रसामग्रीत देखील वापरले जातात, असं सांगून सिंह यांनी यंत्र इंडिया लिमिटेडच्या कामगिरीचा आढावा घेतला. ही कंपनी सध्या मिनी रत्न श्रेणीमध्ये असून लवकरच ही कंपनी महारत्नचा दर्जा गाठेल असा

विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. आज अंबाझरी येथे सुरू झालेल्या अल्युमिनियम एक्स्ट्रज्युन प्रेस मुळे नागपूर सह विदर्भातील संरक्षण निर्मिती परिसंस्थेला चालना मिळेल असं प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी केलं.

**पंतप्रधान प्रोत्साहन निधी वितरण**

प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेंतर्गत २ हजार ४०० कोटी रुपयांच्या प्रोत्साहन निधीचं वितरण आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झालं. देशभरात २०० ठिकाणी, प्रामुख्यानं औद्योगिक आणि रोजगार केंद्र असलेल्या भागात हा कार्यक्रम झाला. प्रथमच नोकरीवर रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी प्रोत्साहन देणं आणि संबंधित कर्मचाऱ्यांना रोजगार देणाऱ्या औद्योगिक संस्थांनाही प्रोत्साहनपर अनुदान देणं, अशा दोन भागात ही योजना राबवली जाणार आहे. गेल्या वर्षी ऑगस्टपासून या योजनेअंतर्गत ६३ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना औपचारिक रोजगार क्षेत्रात आणलं गेलं असून, त्यापैकी जवळपास ३० टक्के महिला असल्याचं, कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी सांगितलं. दरम्यान पंतप्रधान किसान सन्माननिधी योजनेचा २३ व्या हप्त्याचं वितरण उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी पश्चिम बंगालमध्ये हुगळी जिल्ह्यातल्या तारकेश्वर इथून करणार आहेत. या हप्त्यानंतर, फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरू झालेल्या पीएम किसान योजनेतून शेतकऱ्यांना मिळालेल्या रक्कमेचा आकडा ४ कोटी ४६ लाखांचा टप्पा ओलांडेल.

**राष्ट्रपती**

विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय उद्दिष्टापूर्वीच देश सिकलसेल ॲनिमिया या आजाराचं पूर्णपणे निर्मूलन करेल, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. त्या आज मध्य प्रदेशात ओंकारेश्वर इथ आंतरराष्ट्रीय सिकलसेल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. आदिवासी समुदायांमध्ये या आजाराविषयी जनजागृती करण्यासाठी एकत्रित प्रयत्नांचं आवाहनही राष्ट्रपतींनी यावेळी केलं.

**प्रशांत पडोळे**

भंडारा-गोंदिया विधान परिषद निवडणुकीच्या निकालापूर्वीच आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. काँग्रेसचे खासदार प्रशांत पडोळे यांनी भाजपच्या मतदारांनी काँग्रेस समर्थित उमेदवाराला मतदान केल्याचा दावा करत सत्ताधाऱ्यांवर टीका केली.

दोन्ही पक्षांनी विजयाचा दावा केला असून, मतदारांनी नेमका कौल कुणाला दिला हे 22 जून रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतर स्पष्ट होणार आहे.

**मेळघाट जंगल सफारी**

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जंगल सफारीला १५ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली असून पर्यटकांना आता ३० जूनपर्यंत सफारीचा आनंद घेता येणार आहे. मुख्य वनसंरक्षक आदर्श रेड्डी यांच्या आदेशानुसार १ जुलैपासून सफारी बंद राहणार असून जुलै ते सप्टेंबर दरम्यान वन्यजीवांच्या सुरक्षिततेसाठी आणि पावसाळी परिस्थितीमुळे सातही सफारी गेट बंद ठेवण्यात येणार आहेत. पावसाच्या स्थितीनुसार काही बफर झोन खुले ठेवण्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती वन विभागान दिली आहे.

**नक्षल समर्थक जेरबंद**

खून, खुनाचा प्रयत्न, शासकीय सेवकावर हल्ला अशा गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या नक्षल समर्थक आरोपीस पोलिसांनी ११ वर्षांनंतर जेरबंद केलं आहे. बापू व्यंकटी जनगम असे अटकेतील आरोपीचे नाव असून, तो सिरोंचा तालुक्यातील नडीकुडा येथील रहिवासी आहे. बापू जनगम हा नक्षल्यांना मदत करणाऱ्या जनमिलिशिया संघटनेशी संबंधित असल्याची नोंद पोलिसांच्या अभिलेखावर आहे. २००७ पासून त्याच्यावर असरअली पोलिस ठाण्यात खून, खुनाचा प्रयत्न, शासकीय सेवकावर हल्ला यासह अन्य गुन्हे दाखल आहेत. १७ जूनला बापू जनगम हा आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी गावात आल्याची माहिती मिळाल्यानंतर असरअली पोलिसांनी नडीकुडा गावालगतच्या शेतशिवारातून त्याला अटक केली.

**नीट यूजी**

नीट यूजी फेरपरीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय चाचणी संस्था अर्थात एनटीएनं एक अधिकृत व्हॉटसअप संपर्क वाहिनी सुरु केली आहे. परीक्षेसंदर्भातली सर्व अधिकृत माहिती 7827980287 या व्हॉटसअप क्रमांकावर उपलब्ध करुन दिली जाणार आहे. आपल्या व्हॉट्सअप वर परीक्षेसंबंधी कोणताही संदेश आल्यास ब्लू व्हेरिफिकेशन टिक आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीच नाव असल्याची खात्री करुन घ्यावी असं आवाहन करण्यात आलं आहे. नीट यूजीची फेरपरीक्षा येत्या रविवारी होणार आहे.

**रविकांत तुपकर**

बुलढाणा जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी गेल्या चार दिवसापासून अन्न त्याग आंदोलन सुरू केलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून कॅबिनेट मंत्री गिरीश महाजन यांनी बुलढाणा शहरात येऊन आज तुपकर यांच्या मागण्याविषयी तात्काळ सकारात्मक विचार करून निर्णय घेऊ असं आश्वासन दिल्याने तुपकर यांनी आपलं उपोषण पुढील कालावधी पर्यंत स्थगित केलं आहे. मात्र शेतकऱ्यांसाठीची लढाई यापुढे देखील सुरूच राहील असंही ते म्हणाले.

**कौंडण्यपूर पालखी**

विदर्भाची पंढरी आणि रुख्मिणी मातेचे माहेर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कौंडण्यपूर इथल्या श्री विठ्ठल-रुख्मिणी संस्थानातून आषाढी पंढरपूर यात्रेसाठी मानाच्या पायदळ पालखी सोहळ्याचं आज प्रस्थान झालं. सन १५९४ पासून सुरू असलेली ही महाराष्ट्रातील सर्वात जुनी आणि विदर्भातील एकमेव मानाची पायदळ दिंडी असून हजारो वारकरी भाविकांच्या उपस्थितीत पालखी पंढरपूरकडे रवाना झाली.

**समुपदेशकांची नियुक्ती**

दहावी आणि बारावीच्या जून-जुलै 2026 पुरवणी परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचा तणाव कमी करण्यासाठी राज्य शिक्षण मंडळान समुपदेशकांची नियुक्ती केली आहे. परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून मंडळान ७२०८४२९३८१, ९४०४७८३९९६ आणि ९९६०६४४४११ हे हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आले आहेत.

**धनंजय औंढेकर**

महावितरणच्या संचालन विभागाच्या संचालक पदाचा कार्यभार धनंजय औंढेकर यांनी स्वीकारला असून त्यांची थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत असलेल्या औंढेकर यांनी कार्यकारी संचालक म्हणून सौर कृषिपंप योजना आणि प्रधानमंत्री सूर्यघर योजनेच्या अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण योगदान दिल आहे.

**हवामान**

मान्सूनचा पाऊस लांबल्याने विदर्भातील अनेक जिल्ह्यांत उष्णतामान कायम आहे. आज वर्धा जिल्ह्यात उष्णतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला असून अकोला, यवतमाळ, चंद्रपूर आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. उद्या देखील वर्धा, चंद्रपूर आणि अकोला जिल्ह्यात येल्लो अलर्ट कायम राहणार आहे. अधूनमधून तुरळक ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी दखल देत असल्या तरी वातावरणात उकाडा कायम आहे. दरम्यान आगामी काही तासात नागपूर, यवतमाळ आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये अत्यंत हलक्या पावसासह मेघगर्जना आणि वादळी वारे वाहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागान वर्तवली आहे.

**नीरज चोप्रा**

ऑलिम्पिक पदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा आज प्रतिष्ठित दोहा डायमंड लीग स्पर्धेत सहभागी होणार आहे. नीरज चोप्रा काही काळापासून पाठीच्या दुखापतीमुळे स्पर्धेत सहभागी होऊ शकला नव्हता.

**फिफा**

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत, मेक्सिकोन आज ग्वादालहारा स्टेडियमवर दक्षिण कोरियाला १-० न पराभूत करून बाद फेरीच्या ३२ संघांच्या फेरीत पात्र ठरणारा पहिला देश बनण्याचा मान मिळवला.

**मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम**

राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी 1 जून ते 15 ऑगस्ट या कालावधीत चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करण बंधनकारक करण्यात आलं आहे. 15 ऑगस्टनंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर नियमानुसार दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. प्रवाशांशी संवाद सुलभ करणं आणि सेवा अधिक दर्जेदार बनविण हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचं परिवहन विभागान स्पष्ट केल आहे.

*****